## गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस ०९२०/प्र.क्र.१०७/राउशु-३.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत. असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (g) आणि (h१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना नियम “ मुंबई विदेशी मद्य नियम (सुधारणा) नियम, २०२१ ” असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम २५ मधील उप-नियम (४) मध्ये खंड (d) नंतर, उप-खंड (iv) मध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या परंतूकाऐवजी पुढील परंतुक समाविष्ट करण्यात यावा जसे की :—

“ परंतु असे की, अशी अनुज्ञप्ती अशा जागेवरती स्थालांतरीत करता येतील ज्या प्रस्तावित जागेपासून २०० मीटर हवाई अंतरात दुसरी तत्सम अनज्ञप्ती स्थित नसेल. ”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 23th February 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No MIS-0920/C.R. 107/Excise-3.—Wheresas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*), (*g*) and (*h1*) of sub-section (*2*) read with proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows, namely :—

1. These rules may be called Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 2021.

2. In the rules 25 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953, in sub-rule (4), in clause (*d*), in sub-clasue (*iv*), for the existing proviso, the following proviso shall be substituted, namely :—

> " Provided that, the licensed shop shall be shifted to the premises where no shop with similar license is situated within the aerial distance of 200 meters from the proposed premises. "

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.